## नियमित दिवाणी दावा क्रमांक २४५/२०२१ मधील आदेश नि.क्र.२०

**(CNR No. MHSO130003022021)**

१. प्रतिवादी क्र.३ यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुध्द पारीत झालेला विना कैफियत चौकशीचा आदेश रद्दबातल करुन त्यांची दाव्यास कैफियत स्वीकारण्यात यावी याबाबत विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांचे अर्जातील कथन असे आहे की, प्रतिवादी क्र.३ हे वयस्क असल्याने व सतत किरकोळ आजारी पडल्याने त्यास उपचारासाठी वेळ गेल्याने तसेच मिळकतीच्या अनुषंगाने कागदपत्रे सरकारी कार्यालयातून काढणेकामी वेळ गेल्याने प्रतिवादी विहित मुदतीत कोर्टात हजर राहून कैफियत देवू शकले नाहीत. तसेच प्रतिवादी वाहनचालक असल्यामुळे तो वेळोवेळी परगावी गेलेला असल्याने त्यांना दाव्याकामी नेमलेल्या तारखेची समज मिळाली नाही. सबब प्रतिवादी क्र.३ विरुध्द पारीत करण्यात आलेला विना कैफियत चौकशीचा आदेश रद्दबातल करण्यात येवून त्यांची कैफियत स्वीकारणेत यावी अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

३. सदर अर्जावर वादीचे म्हणणे मागविण्यात आले. सदर अर्जावर वादी यांनी आपले म्हणणे देवून असे कथन केले आहे की, कारण योग्य नाही. कागदोपत्री पुरावा नाही. सबब अर्ज रद्द व्हावा. मंजूर झाल्यास कॉस्ट मिळावी.

४. अर्ज व म्हणणे वाचले. सदरचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीचे वाटप होवून मिळणेकरिता दाखल केला आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.३ यांना समन्स दि.२३/११/२०२१ रोजी बेलिफ अहवालाप्रमाणे प्राप्त झाल्याचे दिसते. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम १ प्रमाणे वादीच्या दाव्यास प्रतिवादीने समन्स प्राप्त झालेपासून ३० दिवसाचे आत कैफियत दाखल करायची असते. त्यानंतरही ९० दिवसाची मुदत न्यायालयाच्या परवानगीने दिली जावू शकते. वादीच्या दाव्यास वेळेत कैफियत दाखल केली नाही त्यामुळे त्यांचेविरुध्द पारीत करण्यात आलेला विना कैफियत चौकशीचे आदेश रद्दबातल होवून त्यांची कैफियत स्वीकारण्यात यावी अशी विनंती प्रतिवादीने केली आहे. मात्र अभिलेख पाहता त्यामध्ये विना कैफियत आदेश सदर प्रतिवादीविरुध्द पारीत करण्यात आलेला नाही मात्र प्रतिवादीकडून कैफियत दाखल करण्यास विलंब झाल्याचे दिसते त्यामुळे प्रस्तुत अर्ज विचारात घेवून सदर विलंब भरुन काढता येऊ शकतो. सदर दाव्यामध्ये नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन न घेतल्यास प्रतिवादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे याउलट प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व

प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर घेतल्यास दावा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी वादीच्या दाव्यास कैफियत दाखल करण्यास केलेल्या विलंबाचा विचार करता वादीस खर्चाची रक्कम देऊन तो विलंब भरुन काढता येईल. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल.

## आ दे श

१. प्रतिवादी क्र.३ यांनी रक्कम रुपये रु.५००/– (रक्कम रुपये पाचशे) वादीस खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.३ यांनी वादीस खर्च दिल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येत आहे.

Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2022.10.31 15:23:39 +0530

**बार्शी.** **(एन.एस.सबनीस)**

**दिनांकः– ३१/१०/२०२२** **४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.**

**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक २४५/२०२१ मधील आदेश नि.क्र.१८</u>**

**(CNR No. MHSO130003022021)**

१. प्रतिवादी क्र.१, २ व ४ ते ७ यांनी सदरचा अर्ज दाव्यास कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ होवून दाव्यास कैफियत स्वीकारण्यात यावी याबाबत विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांचे अर्जातील कथन असे आहे की, प्रतिवादी यांनी दाव्यास मुदतीत कैफियत देणे आवश्यक होते परंतु प्रतिवादींना दाव्यास कैफियत देणेस आवश्यक असणारी कागदपत्रे न मिळून आल्याने त्यांच्याकडून माहिती घेवून म्हणणे तयार करता आले नाही. प्रतिवादींना कैफियत दाखल करणेस ३ महिने २० दिवसांचा उशीर झाला आहे. प्रतिवादींनी सदरचा उशीर हा जाणीवपूर्वक केलेला नाही. सबब झालेला विलंब माफ होवून यातील प्रतिवादींची कैफियत स्वीकारणेत यावी अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

३. सदर अर्जावर वादीचे म्हणणे मागविण्यात आले. सदर अर्जावर वादी यांनी आपले म्हणणे देवून असे कथन केले आहे की, कारण योग्य नाही. कागदोपत्री पुरावा नाही. सबब अर्ज रद्द व्हावा. मंजूर झाल्यास कॉस्ट मिळावी.

४. अर्ज व म्हणणे वाचले. सदरचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीचे वाटप होवून मिळणेकरिता दाखल केला आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रतिवादींना समन्स दि.१६/२/२०२२ रोजी बेलिफ अहवालाप्रमाणे प्राप्त झाल्याचे दिसते. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम १ प्रमाणे वादीच्या दाव्यास प्रतिवादीने समन्स प्राप्त झालेपासून ३० दिवसाचे आत कैफियत दाखल करायची असते. त्यानंतरही ९० दिवसाची मुदत न्यायालयाच्या परवानगीने दिली जावू शकते. वादीच्या दाव्यास वेळेत कैफियत दाखल केली नाही त्यामुळे झालेला ३ महिने २० दिवसांचा विलंब माफ होवून त्यांची कैफियत स्वीकारण्यात यावी अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे. परंतु सदर दाव्यामध्ये नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन न घेतल्यास प्रतिवादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे याउलट प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर घेतल्यास दावा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी वादीच्या दाव्यास कैफियत दाखल करण्यास केलेल्या विलंबाचा विचार करता वादीस खर्चाची रक्कम देऊन तो विलंब भरुन काढता येईल. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल.

## आ दे श

१. प्रतिवादी क्र.१, २ व ४ ते ७ यांनी रक्कम रुपये रु.४००/– (रक्कम रुपये चारशे) वादीस खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१, २ व ४ ते ७ यांनी वादीस खर्चाची रक्कम दिल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येत आहे.

Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2022.10.31 15:23:49 +0530

**बार्शी.** **(एन.एस.सबनीस)**

**दिनांकः– ३१/१०/२०२२** **४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.**

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Y. V. Sital |
| (b) | Court | : | Shri. N.S.Sabnis<br>4th Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 31/10/2022. |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 1/11/2022. |